# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई-मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/ ४१८

दिनांक : ८.३.२००४

## // परिपत्रक क्र. ९७ //

**विषय :** प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजनेअंतर्गत समाविष्ठ नसणारी कामे शासनाच्या मान्यतेपूर्वी हाती न घेणेबाबत..

योजनेस प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर योजनेमध्ये समाविष्ठ असणारी कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून विहित नियमांच्या आधिन राहून हाती घेण्यांत येतात. तथापि कांही प्रकरणी असे निदर्शनास आले आहे की, प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजनेमध्ये अंतर्भूत नसलेली मात्र परिस्थितीनुरुप आवश्यक असणारी कामे शासनाच्या परवानगीशिवाय क्षेत्रिय कार्यालयानी हाती घेतलेली आहेत. ही बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व शासनाच्या धोरणाशी विसंगत आहे. या अनुषंगाने आता खालील प्रमाणे निर्देश देण्यांत येत आहेत.

प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजनेमध्ये जी कामे अंतर्भूत नाहीत मात्र प्राप्त परिस्थितीनुसार ती कामे करणे गरजेचे आहे अशी कामे मूळ योजने अंतर्गत प्रत्यक्षात हाती घेण्यापूर्वी शासनाची पूर्व परवानगी घेण्यांत यावी. या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, अन्यथा संबंधितावर कठोर कारवाई करणेत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

( दीपक मसाळे )
सदस्य सचिव

**प्रत :**

मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

अधीक्षक अभियंता, ( यांत्रिकी / मुख्यालय / मनिसंवसं ) म.जी.प्रा., नवी मुंबई / नागपूर.

सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ,

सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. बांधकाम / प्रकल्प विभाग.

तांशा-१